क्रमांक : १६४१० / ब कक्ष
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
विधान भवन, मुंबई.
दिनांक : ८ नोव्हेंबर, २०२३

# :: प रि प त्र क ::

**विषय : महाराष्ट्र विधानसभेच्या सन २०२३ च्या तृतीय (हिवाळी) अधिवेशनातील तारांकित प्रश्नांच्या उत्तराकरिता नेमून देण्यात आलेल्या दिनांकांबाबतचे विवरणपत्र .....**

महाराष्ट्र विधानसभेचे सन २०२३ चे तृतीय (हिवाळी) अधिवेशन गुरुवार, दिनांक ७ डिसेंबर, २०२३ रोजीपासून विधान भवन, नागपूर येथे सुरु होणार आहे. गुरुवार, दिनांक ७ डिसेंबर, २०२३ ते शुक्रवार, दिनांक २९ डिसेंबर, २०२३ या कालावधीतील तारांकित प्रश्नोत्तरांबाबतची माहिती दर्शविणारे विवरणपत्र (मागील पृष्ठावर छापल्याप्रमाणे) आपल्या माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी पाठविण्यात येत आहे.

**ज्या विभागास प्रश्न चिन्हांकित केला आहे त्या विभागास असा प्रश्न अन्य विभागास हस्तांतरित करावयाचा असल्यास, विवरणपत्रात स्तंभ क्रमांक ५ मध्ये प्रश्नांच्या ऑनलाईन हस्तांतरणाचा शेवटचा दिनांक दर्शविण्यात आलेला आहे. उक्त दिनांकानंतर प्रश्न हस्तांतरणाची प्रकरणे या सचिवालयास प्राप्त झाल्यास तारांकित स्वीकृत प्रश्नांच्या उत्तराचा दिनांक/गट बदलून देता येणे शक्य होणार नाही. अशा स्थितीत त्या प्रश्नाच्या उत्तरासाठी नेमून दिलेल्या दिनांकास उत्तर प्राप्त होणे आवश्यक राहील, तसेच संबंधित मा.मंत्री महोदयांना सदर तारांकित स्वीकृत प्रश्नांच्या उत्तराकरिता निश्चित केलेल्या मूळ दिवशीच सभागृहात उपस्थित राहून अनुपूरक प्रश्नांना उत्तरे द्यावी लागतील.**

**उपरोक्त वस्तुस्थिती विचारात घेता, तारांकित प्रश्न अन्य विभागाकडे हस्तांतरीत होत असल्यास, विवरणपत्रात दर्शविण्यात आलेल्या प्रश्नांच्या ऑनलाईन हस्तांतरणाच्या शेवटच्या दिनांकापर्यंत सदर प्रश्नाच्या ऑनलाईन हस्तांतरणाची QIS या संगणक प्रणालीद्वारे कार्यवाही पूर्ण करावी व हस्तांतरणाबाबत विधानसभा प्रश्न कक्षाच्या b1.qust.mls@gmail.com या ई-मेलवर तातडीने पत्राद्वारे या सचिवालयास अवगत करण्याबाबत सर्व मंत्रालयीन विभागांनी दक्षता घ्यावी.**

( सीमा तांबे )
अवर सचिव
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

प्रति,

(१) मा.मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव
(२) मा.उपमुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव
(३) मा.मंत्री यांचे खाजगी सचिव
(४) सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई
यांना माहितीसाठी तथा कार्यवाहीसाठी अग्रेषित.

# महाराष्ट्र विधानसभा
## तृतीय (हिवाळी) अधिवेशन, २०२३

तारांकित प्रश्नांच्या उत्तराचा दिनांक, विभागाकडून उत्तर येण्याचा अंतिम दिनांक तसेच प्रश्नांच्या ऑनलाईन हस्तांतरणाचा शेवटचा दिनांक इत्यादीबाबतची माहिती दर्शविणारे विवरणपत्र

| गट क्र. (१) | गटामध्ये समाविष्ट असलेले मंत्री (२) | प्रश्नांच्या उत्तराचा दिनांक (३) | विभागाकडून उत्तर येण्याचा अंतिम दिनांक (४) | प्रश्नांच्या ऑनलाईन हस्तांतरणाचा शेवटचा दिनांक (५) |
|---|---|---|---|---|
| एक | (१) अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री<br>(२) उच्च व तंत्रशिक्षण, वस्त्रोद्योग, संसदीय कार्य मंत्री<br>(३) सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री<br>(४) सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री<br>(५) अल्पसंख्याक विकास व औकाफ, पणन मंत्री<br>(६) शालेय शिक्षण, मराठी भाषा मंत्री<br>(७) अन्न व औषध प्रशासन मंत्री | सोमवार, दिनांक ११ डिसेंबर, २०२३<br>सोमवार, दिनांक १८ डिसेंबर, २०२३ | सोमवार, दिनांक ०४ डिसेंबर, २०२३<br>सोमवार, दिनांक ११ डिसेंबर, २०२३ | शुक्रवार, दिनांक ०१ डिसेंबर, २०२३<br>शुक्रवार, दिनांक ०८ डिसेंबर, २०२३ |
| दोन | मुख्यमंत्री | मंगळवार, दिनांक १२ डिसेंबर, २०२३<br>मंगळवार, दिनांक १९ डिसेंबर, २०२३<br>*मंगळवार, दिनांक २६ डिसेंबर, २०२३ | मंगळवार, दिनांक ०५ डिसेंबर, २०२३<br>सोमवार, दिनांक ११ डिसेंबर, २०२३<br>*सोमवार, दिनांक १८ डिसेंबर, २०२३ | शुक्रवार, दिनांक ०१ डिसेंबर, २०२३<br>शुक्रवार, दिनांक ०८ डिसेंबर, २०२३<br>*शुक्रवार, दिनांक १५ डिसेंबर, २०२३ |
| तीन | (१) वैद्यकीय शिक्षण व विशेष सहाय्य मंत्री<br>(२) ग्रामविकास व पंचायत राज, पर्यटन मंत्री<br>(३) पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री<br>(४) कामगार मंत्री<br>(५) उद्योग मंत्री<br>(६) सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री<br>(७) महिला व बालविकास मंत्री<br>(८) क्रीडा व युवक कल्याण, बंदरे मंत्री<br>(९) कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री | बुधवार, दिनांक १३ डिसेंबर, २०२३<br>बुधवार, दिनांक २० डिसेंबर, २०२३<br>*बुधवार, दिनांक २७ डिसेंबर, २०२३ | बुधवार, दिनांक ०६ डिसेंबर, २०२३<br>मंगळवार, दिनांक १२ डिसेंबर, २०२३<br>*मंगळवार, दिनांक १९ डिसेंबर, २०२३ | शुक्रवार, दिनांक ०१ डिसेंबर, २०२३<br>शुक्रवार, दिनांक ०८ डिसेंबर, २०२३<br>*शुक्रवार, दिनांक १५ डिसेंबर, २०२३ |
| चार | (१) सहकार मंत्री<br>(२) महसूल, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास मंत्री<br>(३) वने, सांस्कृतिक कार्ये, मत्स्यव्यवसाय मंत्री<br>(४) आदिवासी विकास मंत्री<br>(५) कृषी मंत्री<br>(६) रोजगार हमी योजना, फलोत्पादन मंत्री<br>(७) मदत व पुनर्वसन, आपत्ती व्यवस्थापन मंत्री | गुरुवार, दिनांक ०७ डिसेंबर, २०२३<br>गुरुवार, दिनांक १४ डिसेंबर, २०२३<br>गुरुवार, दिनांक २१ डिसेंबर, २०२३<br>*गुरुवार, दिनांक २८ डिसेंबर, २०२३ | गुरुवार, दिनांक ३० नोव्हेंबर, २०२३<br>गुरुवार, दिनांक ०७ डिसेंबर, २०२३<br>शुक्रवार, दिनांक १५ डिसेंबर, २०२३<br>*गुरुवार, दिनांक २१ डिसेंबर, २०२३ | बुधवार, दिनांक २९ नोव्हेंबर, २०२३<br>शुक्रवार, दिनांक ०१ डिसेंबर, २०२३<br>शुक्रवार, दिनांक ०८ डिसेंबर, २०२३<br>*शुक्रवार, दिनांक १५ डिसेंबर, २०२३ |
| पाच | (१) उप मुख्यमंत्री<br>(२) मृद व जलसंधारण मंत्री<br>(३) गृहनिर्माण, इतर मागास बहुजन कल्याण मंत्री<br>(४) राज्य उत्पादन शुल्क मंत्री | शुक्रवार, दिनांक ०८ डिसेंबर, २०२३<br>शुक्रवार, दिनांक १५ डिसेंबर, २०२३<br>शुक्रवार, दिनांक २२ डिसेंबर, २०२३<br>*शुक्रवार, दिनांक २९ डिसेंबर, २०२३ | शुक्रवार, दिनांक ०१ डिसेंबर, २०२३<br>शुक्रवार, दिनांक ०८ डिसेंबर, २०२३<br>सोमवार, दिनांक १८ डिसेंबर, २०२३<br>*शुक्रवार, दिनांक २२ डिसेंबर, २०२३ | बुधवार, दिनांक २९ नोव्हेंबर, २०२३<br>शुक्रवार, दिनांक ०१ डिसेंबर, २०२३<br>शुक्रवार, दिनांक ०८ डिसेंबर, २०२३<br>*शुक्रवार, दिनांक १५ डिसेंबर, २०२३ |

* गुरुवार, दिनांक ७ डिसेंबर, २०२३ पासून सुरू होणाऱ्या अधिवेशनासाठी अंदाजित तीन आठवड्यांच्या कालावधीत वाढ झाल्यास पूर्व खबरदारी म्हणून जादा एक आठवड्याच्या प्रश्न सूचना कार्यवाहीत घेण्यात येत आहेत.